नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - ३२० Issue - 320 | वार मंगळवार दि. ८ एप्रिल २०२५ Blow- Tuesday Date 8 April 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# घरगुती वापराचा सिलिंडर महागला

## सर्वसामान्यांना आणखी एक झटका



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली पेट्रोल आणि डिझेलच्या किंमती वाढल्यानंतर आता सामान्यांना सरकारने आणखी एक झटका दिला आहे. ८ एप्रिलपासून गॅस सिलिंडर १० किंवा २० नाही तर ५० रुपयांनी महाग झाला आहे. सरकारने घरगुती वापरासाठीचा एलपीजी गॅस सिलिंडर ५० रुपये महाग केल्याचं जाहीर केलं आहे. उज्ज्वला गॅस योजनेच्या अंतर्गत ५०३ रुपयांना मिळणारा सिलिंडर आता ५५३ रुपयांना मिळणार आहे तर ही योजना सोडून असलेला एक सिलिंडर ८०३ रुपयांवरुन ८५३ रुपये इतका झाला आहे. ८ एप्रिलपासून ही दरवाढ लागू करण्यात आली आहहे.

पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंह पुरी यांनी पत्रकारांशी संवाद साधला. आंतरराष्ट्रीय किंमती वाढत आहेत. त्यामुळे ८ एप्रिलपासून एलपीजी गॅस सिलिंडरच्या दरांमध्ये ५० रुपयांची वाढ केली जाते आहे. स्वयंपाकाला लागणाऱ्या गॅस सिलिंडरच्या किंमती वाढल्या आहेत असं त्यांनी जाहीर केलं आहे.घर-गुती गॅस सिलिंडर ५० रुपयांनी महाग झाला आहे. आज म्हणजेच सोमवार ७ एप्रिल रोजी पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी ही माहिती दिली. सध्या दिल्लीत गॅस सिलिंडर ८०३ रुपयांना उपलब्ध आहे. किमती वाढल्यानंतर ही किंमत ८५३ रुपये होईल. तर मुंबईत हीच किंमत आधी ८०२.५० रुपये होती, ती आता ८५२.५० रुपये होईल.

सरकारने मागील वर्षी म्हणजे ८ मार्च २०२४ रोजी महिला दिनी सिलिंडरच्या किमतीत १०० रुपयांची कपात केली होती. त्यावेळी दिल्लीत सिलिंडरची किंमत ९०३ रुपये होती. १ एप्रिल रोजी तेल विपणन कंपन्यांनी १९ किलोच्या व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या किमतीत ४४.५० रुपयांची कपात केली होती. दिल्लीत त्याची किंमत ₹४१ ने कमी होऊन ₹१७६२ झाली. पूर्वी ते ₹१८०३ मध्ये उपलब्ध होते. कोलकातामध्ये ते ₹४४.५० ने कमी होऊन ₹१८६८.५० रुपयांना मिळत आहे, पूर्वी त्याची किंमत ₹१९१३ होती.

# राज्यात उष्णतेची लाट; विदर्भाला येलो अलर्ट, पारा ४३ अंश पार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर: राज्यात उष्णतेची लाट आली आहे. गेल्या आठवड्यात राज्यातील बऱ्याच भागात अवकाळी पाऊस झाल्यानंतर आता पुन्हा एकदा तापमान वाढल्याचं दिसत आहे. राज्यातील तापमानात वाढ होत असल्याचं दिसत आहे. बहुतांश जिल्ह्यांमध्ये पारा ३५ ते ४० अंश आहे. तर काही भागातच ४२ ते ४३ अंशापर्यंत तापमान वाढलं आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, विदर्भातील अकोल्यात सर्वाधिक ४४.२ अंश तापमानाची नोंद करण्यात आली आहे. तर, चंद्रपुरात ४३.६ अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली आहे. त्याशिवाय परभणी जिल्ह्यातील तापमानातही वाढ झाली



आहे. परभणीत आज ४१.०३ अंश पार होता.

विदर्भात उन्हाची तीव्रता वाढू लागली असून मागील काही दिवसांपासून तापमानाचा पारा झपाट्याने चढू लागला आहे. रविवारी अकोला येथे ४३.२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली असून, हे या हंगामातील आतापर्यंतचे सर्वाधिक तापमान ठरले आहे. याम ुळे हवामान विभागाने विदर्भासाठी 'येलो अलर्ट' जारी केला आहे. गुजरात आणि उत्तर-पश्चिम भार-तातून येणाऱ्या उष्ण वाऱ्यांमुळे विदर्भात उष्णतेची लाट पसरत आहे. नागपूर प्रादेशिक हवामान केंद्राचे संचालक आर. बालासुब्रह्मण्यन यांनी दिलेल्या माहितीनुसार, पुढील दोन ते तीन दिवस तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. सध्या विदर्भातील तापमान सामान्यापेक्षा ४ ते ५ अंश सेल्सिअसने जास्त आहे, आणि काही ठिकाणी ते ४५ अंशांवर पोहोचू शकते. अकोला, अमरा-वती, बुलढाणा आणि यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये उष्णतेचा परिणाम अधिक जाणवत आहे. त्यामुळे नागरिकांनी आवश्यक नसल्यास घराबाहेर न पडण्याचे, भरपूर पाणी पिण्याचे आणि उष्माघातापासून बचाव करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, बंगालच्या उपसा-गरात तयार झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे १० ते १२ एप्रिलदरम्यान दक्षिण-पूर्व विदर्भात ढगाळ वा-तावरण निर्माण होण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह हलक्या पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. या पावसामुळे तापमानात काही प्रम णात घट होण्याची शक्यता आहे. राज्यातील इतर भागांमध्येही उष्णतेचा प्रभाव वाढत असून, कोकण, मुंबई, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातील काही शहरांतही ४० अंशांपेक्षा जास्त तापमानाची नोंद झाली आहे. काही भागांमध्ये गारपिटीचाही इशारा हवाम ान विभागाने दिला आहे. पुढील चार दिवस हवामानाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठरणार असून, नागरिकांनी हवामान खात्याच्या सूचना आणि अलर्टकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

# 'वक्फ' कायद्याविरोधात तातडीने सुनावणी, संबंधित याचिका एकत्रित करण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा विचार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : 'वक्फ (दुरुस्ती) विधेयक २०२५'च्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर तातडीने सुनावणी घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने सोम वारी सहमती दर्शवली. ''या मुद्द्यावर अनेक याचिका आहेत, त्या तातडीने सुनावणीसाठी सूचिबद्ध करणे आवश्यक आहे,'' असे सरन्यायाधीश संजीव खन्ना, न्या. संजय कुमार आणि न्या. के. व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले.

'जमियत उलेमा-ए-हिंद'च्या वतीने उप-स्थित असलेले ज्येष्ठ वकील कपिल सिबल यांनी याबाबत निवेदन दिले हो-ते. सिबल यांच्याव्यतिरिक्त वरिष्ठ वकील अभिषेक सिं-घवी आणि वकील निजाम पाशा यांनीही इतर याचिका या वेळी नमूद केल्या. संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये जोरदार चर्चे नंतर मंजूर झालेल्या 'वक्फ (दुरुस्ती) विधेयक, २०२५' ला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी शनिवारी मान्यता दिली. परंतु या कायद्याच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या अनेक याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या आहेत. त्यात काँग्रेस खासदार मोहम्मद जावेद, 'एमआयएम'चे अध्यक्ष खासदार असदुद्दिन ओवैसी आणि आम आदमी पक्षाचे (आप) आम दार अमानतुल्ला खान यांच्याही



याचिका समाविष्ट आहेत.

सरन्यायाधीश खन्ना यांनी वकिलांना या प्रकरणाची याचिका खंडपीठासमोर सूचिबद्ध करण्यासाठी पत्र देण्यास किंवा ई-मेल पाठवण्यास सांगितले. त्यावर सिबल यांनी यादी पाठविल्याचे नमूद केल्यावर, 'निर्णय घेऊन आम्ही त्याची यादी करू', असे सरन्यायाधीशांनी सांगितले. दरम्यान, 'ऑल इंडिया मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डा'नेही (एआयएमपीएलबी) वक्फ (दुरुस्ती) कायदा, २०२५ च्या घटनात्मक वैधतेविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात रविवारी याचिका दाखल केली. विधेयकातील दुरुस्त्या मनमानी, भेदभावपूर्ण आणि बहिष्कारावर आधारित असल्याचा आक्षेप 'एआयएमपीएलबी'चे प्रवक्ते एस क्यू आर इलियास यांनी केला आहे.

आतापर्यंत वक्फ कायद्याच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या १० याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या आहेत.

## खनिज तेलाच्या किमती चार वर्षांच्या निचांकावर

मुंबई : अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतासह अनेक देशांवर टाकलेला करवाढीचा 'बॉम्ब' आणि त्याला चीनच्या प्रत्युत्तरामुळे जागतिक व्यापार युद्ध आणि मंदी ओढावण्याची भीती सोमवारी दृश्य रुपात दिसली. मुंबई शेअर बाजाराच्या 'सेन्सेक्स'ने दिवसभरात २२२७ अंशांची घसरण नोंदवली तर, जगभरातील शेअर बाजारांत घसरगुंडी उडाली. या आर्थिक अस्थैर्याचे परिणाम खनिज तेल आणि सोने यांच्यावरही दिसून येत आहेत. ट्रम्प यांनी सोमवारी चीनवर 'आणखी ५० टक्के' कर लादण्याची धमकी दिल्याने बाजारांतील खळबळ अशीच सुरू राहण्याची चिन्हे आहेत.

भारतासह अन्य देशांवर लावलेले व्यापार कर 'मागे घेणार नाही' असे ट्रम्प यांनी रविवारी जाहीर केले. त्यामुळे आधीच धास्तावलेल्या भांडवली बाजारांची सप्ताहाच्या सुरुवातीला गाळण उडाली. 'सेन्सेक्स'ने गेल्या १० महिन्यांतील दिवसातील सर्वात मोठी २,२२७ अंशांची घसरण नोंदविली. दिवसाच्या सुरुवातीच्या जवळपास ४,००० अंशांच्या घसरगुंडीतून सेन्सेक्स लक्षणीय सावरला, तरी दिवसअखेरच्या त्याच्या तीन टक्क्यांच्या नुकसानीने गुंतवणूकदारांच्या तब्बल १४.०९ लाख कोटी रुपयांच्या मत्तेला गिळून टाकले. राष्ट्रीय शेअर बाजाराचा 'निफ्टी'ही ७४२.८५ अंशांनी घसरला. दोन्ही प्रमुख निर्देशांकांतील हिंदुस्तान युनिलिव्हरचा अपवाद केल्यास सर्व आघाडीचे समभाग मोठ्या घसरणीसह बंद झाले. मुंबई शेअर बाजारात ३,३९१ शेअर्स घसरणीत, तर वाढ साधणारे केवळ ५४३ शेअर्स होते.

# उजनी धरणकाठच्या नागरिकांना सावधानतेचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : भीमा नदीकाठच्या सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, जिल्हास्तरीय आकस्मि क पाणी आरक्षण समितीचे निर्णयानुसार नुसार भीमा नदीव-रील पिण्याचे पाणी आवर्तन उद्या दिनांक ०८.०४.२०२५ रोजी सकाळी ९ वाजता उजनी धरण विद्युत गृह विद्युतगृह मधून सुरुवातीस १६०० इतका विसर्ग सोला-पूर महानगरपालिका, पंढरपूर,सांगोला, मंगळवेढा नगरपरिषद व भीमा नदीकाठच्या ग्राम पंचायत साठी पिण्याचे पाणी योजनांसाठी सोडण्यात येणार आहे. तसेच सदर विसर्गामध्ये आवश्यकतेनुसार टप्प्याटप्प्याने वाढ करण्यात येणार आहे.



तरी भीमा नदी काठच्या सर्व नागरीकांना याद्वारे सुचित करण्यात येते की कृपया नदीप-त्रात कोणीही उतरू नये आणि नदी मधील शेती पंप, नदी काठचे शेती अवजारे व तत्सम साहित्य अथवा जनावरे असल्यास तात्काळ हलविण्यात यावेत. कृपया सखल भागातील संबंधित नागरिकांना सूचना देण्यात याव्यात व सर्वांनी योग्य ती दक्षता घ्यावी व पाटबंधारे विभागास सहकार्य करावे ही विनंती..

## अमेरिकेने लादलेल्या व्यापार करामुळे गोंधळ


## निर्यातदारांसाठी नवीन बाजारपेठांचा शोध

# भारतीय निर्यातदारांना नवीन बाजारपेठा शोधून देण्यासाठी केंद्रीय वाणिज्य मंत्रालय प्रयत्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : अमेरिकेने लादलेल्या व्यापार करामुळे होऊ घातलेल्या दुष्परिणाम ांना तोंड देताना भारताला दुहेरी व्यूहरचना आखावी लागत आहे. एकीकडे अमेरिकेत जाणारी निर्यात कमी होणार असल्याने भारतीय निर्यातदारांना नवीन बाजारपेठा शोधून देण्यासाठी केंद्रीय वाणिज्य मंत्रालय प्रयत्न करत आहे. दुसरीकडे, व्यापार करामुळे रोडावलेली अमेरिकी निर्यातीची तूट भरून काढण्यासाठी चीनसारखा देश भारताकडे मालाचा ओघ वळण्याची भीती आहे. भारतीय निर्यातदारांच्या मदतीसाठी प्रोत्साहनपर मोहीम राबवण्यासाठी वाणिज्य मंत्रालयाने वेगाने हालचाली चालवल्या आहेत. याअंतर्गत निर्यातदारांना रास्त दरात वित्तपुरवठा करण्याबरोबरच युरोपीय महासंघ, ब्रिटन, न्यूझीलंड आणि ओमान या देशांशी मुक्त व्यापार धोरणासाठी चर्चा वाढवण्याचे उपाय करण्यात येत आहेत.

अमेरिकेच्या व्यापार करामुळे भारताच्या निर्यातीला मोठी झळ बसणार आहे. ही निर्यात तूट भरून काढण्यासाठी अन्य राष्ट्रांतील निर्यातीला चालना देण्याची भारताची योजना आहे. त्यासाठी ऑस्ट्रेलिया, ब्राझील, चीन आणि फ्रान्स अशा २० राष्ट्रांशी द्विपक्षीय चर्चा आयोजित करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या आहेत.



एकीकडे, भारतीय निर्यातीला चालना देताना चीनसारख्या देशांतून संभाव्य आयातवाढीवरही भारताला नियंत्रण आणावे लागणार आहे. अमेरिकेने चीनवर ५४ टक्के व्यापार कर आकारला आहे. त्यामुळे चीनची अमेरिकेतील निर्यात कमी होईल. ही तूट भरून काढण्यासाठी चीन भारतातील निर्यातीचा ओघ वाढवेल, अशी भीती उद्योग क्षेत्रातून व्यक्त होत आहे. अशा आयातीवर लक्ष ठेवण्याच्या सूचना वाणिज्य मंत्रालयाची तपास संस्था असलेल्या व्यापार सुधारणा महासंचालनालयाला करण्यात आल्या आहेत.

अमेरिकेने लादलेल्या व्यापार कराच्या पार्श्वभूम ीवर त्या देशाशी लवकरात लवकर व्यापार कर करणे आवश्यक असल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. नवीन व्यापार करांमुळे भारताच्या मुख्य निर्यात क्षेत्रावर अल्पकालीन दबाव वाढला असला तरी या परिस्थितीत भार-ताने अमेरिकेबरोबरच्या द्विपक्षीय व्यापाराला चालना देण्यासाठी प्रयत्न करायला हवेत, अशी अपेक्षा तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. अशा करारामुळे भारतीय मालाला अमेरिकी बाजारपेठेत प्राधान्य मिळू शकेल, गुंतवणूकदारांचे संरक्षण होऊ शकेल आणि दोन्ही देशांत तांत्रिक भागीदारी स्थापित होऊ शकेल, असे तज्ज्ञांनी म्हटले आहे.

नवी दिल्ली : शेअर बाजारातील मोठ्या घसरणीबद्दल काँग्रेसने सोमवारी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे दोघेही एकमेकांना मित्र संबोधतात. मात्र दोघेही अर्थव्यवस्थेवर घाव घालण्यात प्रसिद्ध आहेत, अशी टीका काँग्रेसने केली.

काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस जयराम रमेश यांनी 'एक्स'वर पोस्ट करत केंद्र सरकारवर टीका केली. ''मोदी आणि ट्रम्प स्वत:ला चांगले मित्र म्हणून वर्णन करतात यात आश्चर्य नाही. मात्र दोघेही आपापल्या अर्थव्यवस्थांचे नुकसान करण्यात कुशल आहेत. ८ नोव्हेंबर २०१६ रोजी नोटाबंदी झाली. २ एप्रिल २०२५ रोजी लादण्यात आलेल्या विचित्र परस्पर शुल्काच्या गोंधळाचा परिणाम शेअर बाजारावर झा-लेला आहे,'' असे रमेश म्हणाले.

ट्रम्प यांनी भ्रमाचा भोपळा फोडला आहे. मात्र अशा परिस्थितीला सामोरे जाताना पंतप्रधान नरेंद्र मोदी कुठे दिसत नाहीत. भारताने आता वास्तव स्वीकारले पाहिजे आणि सर्व भारतीयांसाठी उपयुक्त अशी लवचीक, उत्पादन-आधारित अर्थव्यवस्था उभारण्याशिवाय पर्याय नाही, असे राहुल गांधी म्हणाले.

# राज ठाकरे यांच्याविरोधात सुप्रीम कोर्टात याचिका, मनसेची मान्यता रद्द करण्याची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या विरोधात चक्क सुप्रीम कोर्टात याचिका दाखल करण्यात आली आहे. राज ठाकरे यांनी गुढीपाडवा मेळाव्यात आपल्या कार्यकर्त्यांना महत्त्वाचे आदेश दिले होते. बँक, दुकानं आणि इतर आस्थापनांमध्ये म राठी भाषेचा वापर केला जातो की नाही ते तपासायचे आद-ेश राज ठाकरे यांनी आपल्या कार्यकर्त्यांना दिले. यानंतर राज्यभरात मनसे कार्यकर्त्यांनी विविध बँकांमध्ये जावून मराठी भाषेचा आग्रह धरला. या दरम्यान काही ठिकाणी बँक कर्मचाऱ्यांनी मराठी बोलणार नाही, अशी भूमि का घेतली. यामुळे संतापलेल्या मनसैनिकांनी अशा कर्मचाऱ्यांना चोपही दिला. या घटनेमुळे अम राठी बँक कर्मचाऱ्यांमध्ये धास्ती निर्माण झाली आहे. तर दुसरीकडे राज ठाकरे यांनी मराठी भाषामंत्री



उदय सामंत यांच्या आग्रहानंतर संबंधित आंदोलन मागे घेण्याचं आवाहन आपल्या कार्यकर्त्यांना केलं आहे. असं असलं तरी राज ठाकरे यांच्याविरोधात एका उत्तर भारतीय संघटनेच्या प्रमुखाने थेट सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केली आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्याविरोधात सुप्रीम कोर्टात याचिका दाखल करण्यात आली आहे. उत्तर भारतीय विकास सेना प्रमुख सुनील शुक्ला यांनी ही याचिका दाखल केली आहे. मनसे कार्यकर्ते हिंदी भाषिकांवर हल्ला करत असल्याचा आरोप सु-नील शुक्ला यांनी याचिकेत केला आहे. राज ठाकरे यांच्या भडकाऊ भाषणांमुळे हिंदी भाषिकांवर हल्ले होत आहेत, असादेखील आर-ोप याचिकेत करण्यात आला आहे. तसेच मनसेची मान्यता निवडणूक आयोगाने रद्द करावी, अशी मागणी याचिकाकर्त्याने केली आहे. या याचिकेनंतर आता मनसेकडून काय प्रतिक्रिया देण्यात येते? ते पाहणं देखील महत्त्वाचं आहे. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रात अम राठींकडून मराठी भाषिकांवर हल्ला होण्याच्या घटना देखील घडल्या. तसेच एका टेलिफोन कंपनीच्या गॅलरीत गेल्यावर तिथल्या महिला कर्मचाऱ्याला ग्राहकाने मराठीत बोलण्याचा आग्रह केला तेव्हा तिने मराठी येत नाही, असं म्हटलं. अशा बऱ्याच घटना घडल्या. या घटनांवरुन मनसे आक्रमक झाली. मनसेकडून नेहमी मराठी भाषेसाठी विविध आंदोलने करण्यात आ-लेली आहेत.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

मंगळवार दि. ८ एप्रिल २०२५ 

## संपादकीय....

### मंदीच्या गर्तेत...

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतासह अनेक देशांवर टाकलेला करवाढीचा 'बॉम्ब' आणि त्याला चीनच्या प्रत्युत्तरामुळे जागतिक व्यापार युद्ध आणि मंदी ओढावण्याची भीती सोमवारी दृश्य रुपात दिसली. मुंबई शेअर बाजाराच्या 'सेन्सेक्स'ने दिवसभरात २२२७ अंशांची घसरण नोंदवली तर, जगभरातील शेअर बाजारांत घसरगुंडी उडाली. या आर्थिक अस्थैर्याचे परिणाम खनिज तेल आणि सोने यांच्यावरही दिसून येत आहेत. ट्रम्प यांनी सोमवारी चीनवर 'आणखी ५० टक्के' कर लादण्याची धमकी दिल्याने बाजारांतील खळबळ अशीच सुरू राहण्याची चिन्हे आहेत. भारतासह अन्य देशांवर लावलेले व्यापार कर 'मागे घेणार नाही' असे ट्रम्प यांनी रविवारी जाहीर केले. त्यामुळे आधीच धास्तावलेल्या भांडवली बाजारांची सप्ताहाच्या सुरुवातीला गाळण उडाली. 'सेन्सेक्स'ने गेल्या १० महिन्यांतील दिवसातील सर्वात मोठी २,२२७ अंशांची घसरण नोंदविली. दिवसाच्या सुरुवातीच्या जवळपास ४,००० अंशांच्या घसरगुंडीतून सेन्सेक्स लक्षणीय सावरला, तरी दिवसअखेरच्या त्याच्या तीन टक्क्यांच्या नुकसानीने गुंतवणूकदारांच्या तब्बल १४.०९ लाख कोटी रुपयांच्या मत्तेला गिळून टाकले. राष्ट्रीय शेअर बाजाराचा 'निफ्टी'ही ७४२.८५ अंशांनी घसरला. दोन्ही प्रमुख निर्देशांकांतील हिंदुस्तान युनिलिव्हरचा अपवाद केल्यास सर्व आघाडीचे समभाग मोठ्या घसरणीसह बंद झाले. मुंबई शेअर बाजारात ३,३९१ शेअर्स घसरणीत, तर वाढ साधणारे केवळ ५४३ शेअर्स होते. व्यापक बाजाराला विक्रीचा दणका अधिक मोठा बसताना दिसला, गेल्या आठवड्यात लादलेली कर वाढ उठवली जाण्यासाठी परदेशातील सरकारांना 'खूप पैसा' मोजावा लागेल, असा ट्रम्प यांनी आग्रह कायम राखल्याने सोमवारी जागतिक बाजारपेठांमधील घसरणीचे सत्र सुरूच राहिले. आशियाई बाजारपेठांमध्ये, सोमवारी हाँगकाँगचा हँग सेंग निर्देशांक १३ टक्क्यांहून अधिक, टोक्योचा 'निक्केई २२५' जवळजवळ ८ टक्क्यांहून अधिक, चीनचा 'शांघाय एसएसई कंपोझिट' निर्देशांक ७ टक्क्यांहून अधिक आणि दक्षिण कोरियाचा कोस्पी ५ टक्क्यांहून अधिक घसरला.

# ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडून 'आषाढीवारी' पूर्वतयारीचा आढावा

## रस्ते व पालखीतळ दुरुस्तीचे प्रस्ताव दोन दिवसात सादर करा : ना. जयकुमार गोरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे म पालखी सोहळ्यात वारकऱ्यांची गैरसोय टाळण्यासाठी स्वच्छ, शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यासह पालखी म ार्गावरील रस्ते, पालखीतळ दुरुस्तीसाठीचे प्रस्ताव दोन दिवसांत सादर करा. पालखी मार्गावरील रस्ते दुरुस्तीच्या अडचणीवर कायम स्वरुपी तोडगा काढण्यासाठी मुख्यमंत्री ग्राम सडक योज-नेतून रस्त्याच्या कामांना म ान्यता व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनस्तरावर पाठपुरावा करण्यात येईल, असे आश्वासन ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित आषाढीवारी पूर्वतयारी आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन देसाई, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, अपर आयुक्त अरुण आनंदकर, उपायुक्त विजय मुळीक, नितीन माने, दत्तात्रय लांघी, तसेच दूरदृश्य प्रणालीद्वारे सातारा, सोलापूर, नाशिक व जळगाव जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व पोलीस अधीक्षक उपस्थित होते.

मंत्री श्री. गोरे म्हणाले, प्रत्येक मुक्काम ाच्या ठिकाणी, पालखी मार्ग व विसावा स्थानांवर स्वच्छता राखली जाईल याची विशेष खबरदारी घ्यावी. स्वच्छतेसाठी पुरेशा प्रमाणात फिरती शौचालये आणि अधिक प्रमाणात स्वच्छता कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी. टँकरमधील पाण्याच्या शुद्धतेबाबत नियमित तपासणी करावी. पाण्याच्या स्रोतांचे शुद्धीकरणही निटपणे होईल याकडे लक्ष द्यावे. पालखी मार्गावरील रेस्टॉरंट, हॉटेल्स यांची स्वच्छता व अन्न शुद्धतेची खात्री करावी. तसेच पंढरपूर शहरातील कचऱ्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ व वाहनांची व्यवस्था करावी, पंढरपूर शहरात सोलापूर जिल्हा परिषद व पोलीस प्रशासनाने ड्रोनद्वारे नियंत्रण ठेवण्यासाठी संयुक्त व्यवस्थापन यंत्रणा तयार ठेवावी, वारीदरम्यान देण्यात आलेल्या कामांसाठी कंत्राटदारांकडून अटी व शर्तीचे पालन करुन कामे होण्यासाठी त्यांच्यावर शासकीय यंत्रणेने अंकुश ठेवावा, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. ग्रामपंचायतींना आगाऊ निधी देण्याची व्यवस्था करण्यात येईल असे सांगून पालखी सोहळ्यादरम्यान पिण्याचे पाणी, आरोग्य आणि स्वच्छतेसाठी निधीची



कमतरता भासू दिली जाणार नाही, अशी ग्वाहीदेखील श्री.गोरे यांनी दिली.

विभागीय आयुक्त श्री. पुलकुंडवार यांनी सादरीकरणाद्वारे करण्यात आलेल्या नियोजनाची माहिती दिली. स्वच्छ आणि निर्मल वारीसाठी विशेष नियोजन करण्यात आले असून पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता तपासणी, प्रथमोपचार पेट्या, निवारा केंद्र, हिरकणी कक्ष आदी सुविधांसोबत वारकऱ्यांना आरोग्य सुविधा देण्यात येणार असल्याचे सांगून स्वच्छ, निर्मल व सुरक्षित वारीसाठी सर्व विभागांनी समन्वय ठेऊन दिलेल्या सूचनांचे पालन करावे तसेच स्थानिक प्रशासनाशी समन्वय ठेऊन पोलीस वाहतूक विभागाने पाण्याचे टँकर पालखी तळ व विसाव्याच्या ठिकाणी वेळेत पोहोचतील याची खबरदारी घ्यावी, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

**यावेळी मंत्री श्री. गोरे यांनी आषाढीवारीच्या अनुषंगाने सर्वच जिल्ह्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. पुणे, सातारा, सोलापूर, नाशिक व जळगाव मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पालखी सोहळ्याच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या पूर्वतयारीची माहिती दिली.**

# भारतीय जनता पार्टी चा ४५ वा वर्धापन दिन छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी जिलेबी वाटून उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : ६ एप्रिल २०२५ रोजी पंढरपूर मध्ये भारतीय जनता पार्टीचा ४५ वा वर्धापन दिन छत्रपती शिव-ाजी महाराज चौक या ठिकाणी जिलेबी वाटून मोर्चा साजरा झाला यावेळी माजी आमदार प्रशांत परिचारक यांची प्रमुख उपस्थिती होती.

जावळी भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सदस्य बाळासाहेब बडवे हा-तात पंढरपूरच्या भारतीय जनता पार्टीच्या कार्यकारिणीच्या मूळ वटवृक्षाची एक फांदी म्हणून ज्यांनी भारतीय जनता पार्टीच्या स्थापनेपासून काम केलेले होते त्या बाबासाहेबांनी यावेळी भारतीय जनता पार्टीच्या ध्वजाचे पूजन केले त्याचबरोबर आज रामनवमीच्या योग असल्यामुळे राम ध्वजाची पूजन करून श्री विठ्ठल रुक्मिणीला जिलेबीचा निवेद्य दाखवून जिलेबीचे वाटप केले.

यावेळी २००४ च्या कार्यकाळातील माजी तालुकाध्यक्ष पंढरपूर पंचायत समिति उपसभापती महाराष्ट्र द्राक्ष बागायतदार संघ माजी अध्यक्ष व संघाचे विद्यमान जिल्हा कार्यकारणी सदस्य श्री प्रशांत भैया देशमुख सचिन कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती श्री संतोष दादा घोडके सोल-ापूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष डॉक्टर प्राजक्ता बेहणारे, पंढरपूर शहराध्यक्ष ज्योती शेटे, जिल्हा सतीश व जिल्हा सोशल मीडिया प्रमुख सुप्रिया काकडे शहर उपाध्यक्ष सौ सुवर्णाताई कुरणावळकर शहर उपाध्यक्ष




सौ शिल्पा महमाने, यांनी सर्व नागरिकांनी भावी भक्तांना जिलेबी वाटून पक्षाचा वर्धापन दिन मोठ्या आनंदात साजरा करण्यात आला यावेळी पक्षाचे पंढरपूर शहर व तालुक्यातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# जि.प. शाळा सिंदगाव व विद्यार्थ्यांकडून कुडकले यांना निरोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिंदगाव/प्रतिनिधी : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सिंदगाव येथे आदरणीय कुडकले सरांना व आठवीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. कर्तव्यनिष्ठ,प्रामाणिक, खिलाडूवृत्ती असलेले तालुका आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक आदरणीय कुडकले सर यांचा निर-ोप व ८ वीच्या वर्गाचा निरोप समारंभ घेण्यात आला . या प्रसंगी सिंदगाव गावचे माझी सरपंच श्री. विवेकानंद मेलगीरी,नवनिर्वाचित उपसरपंच सुवर्णाताई गायकवाड, गंगाधर पेठसांगवे ग्रा. प्रं. सदस्य, पत्रकार राजेंद्र बनजगोळे, प्रदीप बनजगोळे,गुरुनाथ परशेट्टी, शा. व्य. समिती अध्यक्ष अवधूत बनजगोळे, अशपाक शेख, सुभाष गायकवाड हे उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष बोरगाव केंद्राचे केंद्र प्रमुख व शाळेचे मुख्याध्यापक करदुरे सर हे होते . प्रमुख मार्गदर्शक ढाले साहेब हे होते . कुडकले सरांनी भविष्यात येणाऱ्या संकटांना विद्यार्थ्यांनी कसे तोंड द्यावे हे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले व कोणत्याही गोष्टीचा अतिरेक वापर करू नये हे सांगितले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भंडारवाड सर यांनी केले आभार प्रदर्शन गटलेवार सर यांनी केले. यावेळी कार्यक्रमासाठी ज्येष्ठ शिक्षिका बटगिरी मॅडम, मोरे मॅडम , नळगिरे मॅडम , मुनाळे मॅडम, भंडारवाड सर, गटलेवार सर, सागर पाटील,अजय शिंदे, चंद्रकांत शिंदे, बसवराज सुतार यांनी परिश्रम घेतले.

# सर्वसामान्य नागरिकांपर्यंत आरोग्य योजनांचा लाभ देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहावे : विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे

**तिक आरोग्य दिनानिमित्त विविध आरोग्य योजनांचा शुभारंभ संपन्न**

मुंबई : सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत शुभारंभ करण्यात आलेल्या विविध योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहचविण्यासाठी आरोग्य विभागाने सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक आहे. जेणेकरून आरोग्य विषयक योजनांचा लाभ गरजू नागरिकांना मिळेल आणि त्यापासून कोणीही वंचित राहणार नाही, असे प्रतिपादन विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी केले.

यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे आयोजित केलेल्या या कार्यक्रमात विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे बोलत होते. यावेळी विधान परिषदेच्या सदस्या मनिषा कायंदे, सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव डॉ. निपुण विनायक, विरेन्द्र सिंह, आरोग्य सेवाचे आयुक्त तथा मुंबई राष्ट्रीय अभियानाचे संचालक अमगोथ श्री रंगा नायक, राज्य कामगार विमा योजनेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आस्तिककुमार पाण्डेय, म ुंबई आरोग्य सेवा संचालक डॉ. नितीन अंबाडेकर यांच्यासह राज्यातील विविध आरोग्य संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

सभापती प्रा. शिंदे म्हणाले, राज्याचा सार्वजनिक आरोग्य विभाग अतिशय चांगल्या पद्धतीने कार्यरत असून आरोग्य विभागातील कर्मचारी तसेच नागरिकांनी आपल्या निरोगी आरोग्य राखण्यासाठी स्वतःला वेळ द्यावा व नियमित व्यायाम करावा, असा सल्लाही त्यांनी दिला. राज्यातील जनतेचा आरोग्य विभागावर विश्वास आहे. कोविडच्या काळात त्याची प्रचिती सर्वांना आली असून लोकांचा हा विश्वास आरोग्य विभागाने अधिक दृढ करण्यासाठी कसोशीने व कर्तव्य तत्परतेने काम करावे असेही प्राध्यापक शिंदे म्हणाले.

कार्यक्रमात बोलताना आरोग्यमंत्री आबिटकर म्हणाले की, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या योजनांचा सर्वसामान्यांनी फायदा करून घेतल्यास आरोग्य विषयक खर्चात ७०% पर्यंत बचत होणार आहे. जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय आणि ग्रामीण रुग्णालयांमध्ये सोनोग्राफी, एक्सरे, ईसीजी, सिटी स्कॅन, एमआरआय, डायलेसिस अशा अत्याधुनिक सुविधा आता मोफत उपलब्ध असल्याची माहिती नागरिकांना असणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने आरोग्य विषयक विविध योजनांची व्यापक प्रचार व प्रसिद्धी होणे आवश्यक असल्याचे मत यावेळी त्यांनी व्यक्त केले.

यासोबत सर्व्हायकल कॅन्सर प्रतिबंधासाठी ९ ते १४ वयोगटातील मुलींसाठी लसीकरण मोहिमेची घोषणा झाली. 'प्रीव्हेन्शन इज बेटर दॅन क्युअर' या संकल्पनेनुसार, कॅन्सरसारख्या गंभीर आजारांचे प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यावर भर देण्यात येणार आहे. याशिवाय, आरोग्य संस्थांच्या निरीक्षण प्रणालीचे उद्घाटन, बांधकाम प्रकल्पांच्या ऑनलाइन पोर्टलचा शुभारंभ, तसेच उझठ थेरपीसारख्या महत्त्वपूर्ण प्रशिक्षण उपक्रमांचाही शुभारंभ आज करण्यात आला. या सर्व उपक्रमांचा उद्देश म्हणजे नागरिकांना वेळीच आणि प्रभावी सेवा उपलब्ध करून देणे आहे.

जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने आरोग्य विभागात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या डॉक्टर्स, अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार करून त्यांचे विशेष सन्मान करण्यात आले. यावेळी बोलताना आरोग्य मंत्री आबिटकर म्हणाले की, सार्वजनिक आरोग्य व्यवस्था बळकट करण्यासाठी प्रत्येकाने आपली सेवा कर्तव्यबुद्धीने केल्यास राज्याची आरोग्यसेवा आणखी गतिमान होण्यास बळ मिळणार आहे. कार्यक्रम ाच्या शेवटी, 'आरोग्यं धनसंपदा' या मंत्राचा उच्चार करत संपूर्ण महाराष्ट्राच्या आरोग्यसेवेचा संकल्प पुन्हा एकदा नव्याने करण्यात आला. यावेळी उप-स्थित मान्यवरांनी सर्व नागरिकांना स्वतःच्या आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन देखील मंत्री श्री. आबिटकर यांनी केले.

या आरोग्य सेवा योजनांचा झाला शुभारंभ... e-Sushrut (HMIS System) संकेतस्थळाचे विस्तारीकरण शुभारंभ

महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी प्रणालीचे (झेलरू छीीळपस क्रेश लीं) ऑनलाईन पद्धतीने प्रमाणपत्र वितरण शुभारंभ

राज्यातील ६ जिल्ह्यांत ६ आरोग्य संस्थांमध्ये डायलिसीस युनिटचा शुभारंभ

राज्यातील आरोग्य संस्थांच्या बांधकामाच्या ऑनलाईन संनियंत्रण व पाठपुरावा सॉफ्टवेअरचे उद्घाटन

गर्भाशयमुख कर्करोग जनजागृती (९ ते १४ वर्षे वयोगट) अभियान – कर्करोगासंबंधी जनजागृती आणि प्रतिबंधात्मक उपायांची प्रभावी अंम लबजावणी

महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी रुग्णालयांमध्ये महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योज-नेचा शुभारंभ – आता कामगारांसहित सर्वसामान्य जनतेसाठी सुद्धा खुली

महाराष्ट्र राज्यात सीपीआर प्रशिक्षणाचे उद्घाटन व प्रात्यक्षिकांचे सादरीकरण आरोग्य सेवा निरीक्षण प्रणालीचा शुभारंभ

आरोग्य सेवा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या

आरोग्य संस्थांचा सन्मान...

✻ राष्ट्रीय अंधत्व निवारण कार्यक्रम ात उल्लेखनीय कामगिरी करणारा जिल्हा – मोतीबिंदू शस्त्रक्रिया – प्रथम – बीड, द्वितीय – धाराशिव

✻ कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेत उल्लेखनीय कामगिरी करणारा जिल्हा – प्रथम – नांदेड, द्वितीय – पालघर, लातूर महानगरपालिका

✻ मोठ्या (ारक्षी) शस्त्रक्रिया करणारे १०० खाटाचे उपजिल्हा रुग्णालय – प्रथम – उपजिल्हा रुग्णालय गडहिंग्लज, कोल्हापूर, द्वितीय – उपजिल्हा रुग्णालय अचलपूर, अधिकाधिक मोठ्या (ारक्षी) शस्त्रक्रिया करणारे ५० खाटाचे उपजिल्हा रुग्णालय – प्रथम – उपजिल्हा रुग्णालय देगलूर, जिल्हा नांदेड, द्वितीय – उपजिल्हा रुग्णालय गंगाखेड, परभणी

अधिकाधिक मोठ्या (ारक्षी) शस्त्रक्रिया करणारे ग्रामीण रुग्णालय प्रथम – ग्रामीण रुग्णालय अहमदपूर, जिल्हा लातूर, द्वितीय ग्रामीण रुग्णालय माहूर, जिल्हा नांदेड

गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम अंतर्गत सर्वात जास्त संस्थांना राष्ट्रीय पातळीवर प्रमाणित करणारा जिल्हा प्रथम – लातुर, द्वितीय धाराशिव

जास्त प्रसुती करणारे प्राथमिक आरोग्य केंद्र (झक्ऊ) – प्रथम – प्राथमिक आरोग्य केंद्र साईवन ता. डहाणू जिल्हा पालघर, द्वितीय – प्राथमिक आरोग्य केंद्र, शेंदूर्णी ता. जामनेर जिल्हा जळगाव

जास्त प्रसुती करणारे नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र (महानगरपालिका) – नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र आकुर्डी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

जास्त प्रसुती करणारे ग्रामीण रुग्णालय – प्रथम ग्रामीण रुग्णालय धडगाव, जिल्हा नंदुरबार, द्वितीय ग्रामीण रुग्णालय स्पर्श सस्तूर, ता. लोहारा जिल्हा धाराशीव

आरबीएसके कार्यक्रमांतर्गत उल्लेखनीय कामगिरी करणारा जिल्हा (विद्यार्थी तपासणी, हृदय शस्त्रक्रिया व इतर शस्त्रक्रिया). प्रथम कोल्हापूर, द्वितीय – पुणे

असंसर्गजन्य आजार नियंत्रण कार्यक्रमामध्ये उल्लेखनीय कामगिरी करणारा जिल्हा प्रथम – सातारा द्वितीय वाशीम

सिकल सेल आजार नियंत्रण कार्यक्रमामध्ये उल्लेखनिय कामगिरी करणारा जिल्हा (सिकलसेल तपासणी) प्रथम नागपुर द्वितीय नाशिक

उल्लेखनीय कामगिरी करणारे विशेष नवजात शिशु काळजी कक्ष (डछउण) – प्रथम डागा रुग्णालय, नागपुर द्वितीय उपजिल्हा रुग्णालय, जव्हार जिल्हा पालघर

उल्लेखनीय कामगिरी करणारे पोषण पुनर्वसन केंद्र (छठउ) – प्रथम – उपजिल्हा रुग्णालय पांढरकवडा, जिल्हा यवतमाळ, द्वितीय जिल्हा रुग्णालय, हिंगोली

मोबाईल मेडिकल यूनिट (एमएमय) कार्यक्रमांतर्गत उल्लेखनीय कामगिरी करणारा जिल्हा प्रथम ठाणे, द्वितीय नांदेड

पाच वर्षात सातत्याने बालमृत्यू कमी करणारा जिल्हा प्रथम धाराशीव

पाच वर्षात सातत्याने मातामृत्यू कमी करणारा जिल्हा – प्रथम रायगड

सर्वात जास्त खप-हैंीश उळ-रश्रीळी करणाऱ्या आरोग्य संस्था प्रथम – डायलिसीस सेंटर, चंद्रपुर; द्वितीय – जिल्हा रुग्णालय, गडचिरोली

उल्लेखनीय कामगिरी करणारे अतिदक्षता कक्ष (खउण) – जिल्हा रुग्णालय धुळे

राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रम ांतर्गत उल्लेखनीय कामगिरी करणारा जिल्हा प्रथम गोंदिया, द्वितीय धाराशीव

राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रम ांतर्गत उल्लेखनीय काम करणारी महानगरपालिका: प्रथम मालेगाव, महानगरपालिका, द्वितीय धुळे म हानगरपालिका

कष्ठरोग निर्मलन कार्यक्रमांतर्गत उल्लेखनीय कामगिरी करणारा जिल्हा प्रथम चंद्रपुर, द्वितीय सातारा

जिल्हा आरोग्य आधिकारी कार्यक्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारा जिल्हा जिल्हा आरोग्य अधिकारी, अकोला, द्वितीय जिल्हा आरोग्य अधिकारी, धाराशीव

जिल्हा शल्य चिकित्सक कार्यक्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारा जिल्हा: प्रथम जिल्हा शल्य चिकित्सक वाशिम, द्वितीय जिल्हा शल्य चिकित्सक, नाशिक

वैद्यकीय आरोग्य अधिकारी कार्यक्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारी महानगरपालिका – प्रथम वैद्यकीय आरोग्य अधिकारी, सांगली महानगरपालिका, द्वितीय वैद्यकीय आरोग्य अधिकारी पिंपरी चिंचवड म हानगरपालिका

उल्लेखनीय कामगिरी करणारे १०० खाटांचे रुग्णालय प्रथम उपजिल्हा रुग्णालय कराड जिल्हा सातारा, द्वितीय उपजिल्हा रुग्णालय, शहापूर जिल्हा ठाणे उल्लेखनीय कामगिरी करणारे म हिला रुग्णालय प्रथम महिला अकोला, द्वितीय महिला रुग्णालय, अमरावती

किडनी ट्रांसप्लांट मध्ये उल्लेखनीय कामगिरी करणारे रुग्णालय – विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय अमरावती

आयुष्मान भारत डिजिटल मिशन अंतर्गत उल्लेखनीय कामगिरी – ग्रामीण भाग– हिंगोली जिल्हा, शहरी भाग – पनवेल महानगरपालिका

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### पूर्व वैमानस्यातून तिघांनी केली मारहाण




सोलापूर : मागील भांडणाच्या रागातून तिघांनी मारहाण केल्याची घटना शनिवार (दि.५) घडली. या प्रकरणी अच्युत वसंत पंडित (वय-४४-,रा.कृष्णा कॉम्प्लेक्स, दक्षिण कसबा) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून प्रशांत गंभीरे,पंकज गंभीरे आणि त्यांची आई यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

यात अधिक माहिती अशी की,यातील फिर्यादी हे लिफ्टमधून घरी जात होते.यावेळी यातील संशयित आरोपी प्रशांत गंभीरे हा लिफ्टमध्ये आला.फिर्यादी बाहेर जाताना मागील भांडणाच्या रागातून मागून फिर्यादीला धक्का दिला. यावेळी फिर्यादीने त्यास धक्का का दिला असे विचारणा केली असता शिवीगाळ केली व उर्वरित संशयित दोन आरोपींनी फिर्यादीस मारहाण करून जखमी केले.यावेळी फिर्यादी यांची पत्नी डॉ.विना कात्रे,बिडकर काका तेथे येऊन फिर्यादीस संशयित आरोपींच्या ताब्यातून सोडविले असे फिर्यादीत नमूद आहे.

### बल्कर चालकाचा मोबाईल पळविला

सोलापूर : विजापूर रोड बायपास येथील ब्रिज जवळ जंगली हॉटेल समोर बल्करमध्ये झोपलेल्या चालकाचा मोबाईल चोरून नेल्याची घटना शुक्रवारी घडली.याप्रकरणी खंडू काशिनाथ बनसोडे (वय-३१,रा.मु.पो.लोहगाव,ता.तुळजापूर जिल्हा धाराशिव) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात तक्रार दिली.त्याच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.


# शहरातील उड्डाणपूलाच्या सुधारित प्रस्तावासाठी ९६६ कोटी रुपयांचा निधी मंजूर

## केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची माहिती : पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार सचिन कल्याणशेट्टी आणि आमदार देवेंद्र कोठे यांच्या प्रयत्नांना यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर शहरातील उड्डाणपूलाच्या सुधारित प्रस्तावासाठी ९६६.२४ कोटी रुपयांच्या निधीला मंजूरी देण्यात आल्याची माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिली. उड्डाणपुलाच्या कामाला सुरुवात होण्याकरिता पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार सचिन कल्याणशेट्टी आणि आमदार देवेंद्र कोठे यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे.

२०१५ साली सोलापूर शहरासाठी जुना पुणे नाका ते पत्रकार भवन तसेच जुना बोरामणी नाका ते पत्रकार भवन असे दोन उड्डाणपूल मंजूर झाले आहेत. उड्डाणपूल मंजुर होऊन ९ वर्षे उलटली तरीही तांत्रिक कारणांमुळे उड्डाणपूल बांधण्याच्या कामाला विलंब लागत होता. नुकत्याच झालेल्या नागपूर अधिवेशन काळात आमदार देवेंद्र कोठे आणि आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची नागपूर येथे भेट घेऊन उड्डाणपुलाच्या कामासाठी निधी आणि इतर बाबींची पूर्तता करण्याची मागणी केली होती. तसेच आमदार देवेंद्र कोठे यांनी अधिवेशनात उड्डाणपूलाबाबत




लक्षवेधीही मांडली होती. ९०% भूसंपादन आणि निविदा प्रक्रिया होऊनही दोन्ही उड्डाणपुलाचे काम अद्याप सुरू झालेले नाही. ते कधी सुरू होणार ? असा प्रश्न आमदार देवेंद्र कोठे यांनी मार्च महिन्यात झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात लक्षवेधीच्या माध्यमातून उपस्थित केला होता. यावर उद्योगमंत्री उदय सामंत यांनी तसेच नगरविकास खात्याने सकारात्मक उत्तर देत लवकरच उड्डाणपुलाचे काम सुरू होण्याकरिता शासनस्तरावरून प्रयत्न होतील, असे सांगितले होते.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेला शब्द पाळला

**विधानसभा निवडणुकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रासह सोलापूरकरांना 'महाराष्ट्र आता थांबणार नाही' असे म्हणत विकासाचे अभिवचन दिले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी सोलापूरकरांना दिलेला शब्द पाळत उड्डाणपुलासाठी ९६६.२४ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी दिली आहे. त्याबद्दल दोघांचेही आभार मानावे तितके कमी आहेत. याकामी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांनीही शासनाकडे पाठपुरावा केला. यासर्वांचे समस्त सोलापूरकरांतर्फे आभार.**

**– देवेंद्र कोठे, आमदार, शहर मध्य**

पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत शहरातील दोन्ही उड्डाणपूलांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी शासन दरबारी पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले होते. सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांनीही उड्डाणपुलाच्या निर्मिती प्रक्रियेला वेग येण्यासाठी नियमित पाठपुरावा सुरू ठेवला आहे.

पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार देवेंद्र कोठे आणि आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या यशस्वी पाठपुराव्यामुळे केंद्र शासनाने सोलापूर शहरातील दोन्ही उड्डाणपुलासाठी ९६६.२४ कोटी रुपये दिले आहेत. आता उर्वरित भूसंपादन आणि तांत्रिक बाबींची पूर्तता झाल्यानंतर उड्डाणपुलाच्या निर्मितीची प्रक्रिया मूर्त स्वरूपात येणार आहे.


**मेअखेर निघणार निविदा**

उड्डाणपुलासाठी उर्वरित भूसंपादन पूर्ण करुन मेअखेर सुधारित उड्डाणपूलासाठीची निविदा निघणार आहे, असे दिल्लीस्थित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सोलापूर महानगरपालिकेला कळवले आहे.

**६ ठिकाणी प्रवेश आणि निर्गमन रॅम्प**


सोलापूर शहरातून जाणाऱ्या उड्डाणपूलाला ६ ठिकाणी प्रवेश आणि निर्गमन रॅम्प असणार आहेत. तसेच दोन सर्व्हिस रस्तेही असणार आहेत.


# चैत्री एकादशीनिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर व परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई














**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : चैत्री यात्रेनिमित्त श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिर, मंदिर परिसर, श्री.संत तुकाराम भवन व श्री.संत ज्ञानेश्वर दर्शन मंडप या ठिकाणी आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

श्री च्या गाभा-यावरील कळसास रोषणाई करण्यात आली असल्याने, भाविक कळस दर्शना बरोबर विद्युत रोषणाईचा आनंद घेत आहेत. संपूर्ण परिसर प्रकाशमय झाला आहे.

सदरची विद्युत रोषणाई श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर समिती मार्फत करण्यात आली असून, याची जबाबदारी विभाग प्रमुख शंकर मदने यांना देण्यात आली आहे. यासाठी एलईडी माळा, लटकन, तोरणे, रोप लाईट, आर्टीकल, व्हाईट व वॉर्म फोकस इत्यादी अत्याधुनिक साधनांचा वापर करण्यात आला आहे. तसेच सुरक्षतेच्या दृष्टीने देखील अत्याधुनिक मशिनरी बसविण्यात आलेल्या आहेत.

## टेम्पोत ठेवलेला मोबाईल चोरट्याने पळवला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : वसंत पार्किंग येथील टेम्पो क्रमांक टीएस.१६.युसी.६७११ हा टेम्पो पार्क करून फिर्यादी अरिफअहमद मोहम्मद रफीक शेख (वय-२७,रा. निजामाबाद,राज्य तेलंगणा हैदराबाद) यांनी त्यांचा २५ हजार रुपये किमतीचा मोबाईल टेम्पो ठेवून झोपी गेले असता, त्यावेळी अज्ञात चोरट्याने त्यांचा मोबाईल चोरून नेल्याची घटना ४ ते ५ एप्रिल दरम्यान घडली. याप्रकरणी शेख यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून पोलीस हवालदार घुगे हे तपास करीत आहेत.

**एकादशीला ६० हजार राजगिरा लाडू प्रसाद** | **कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके**

# चैत्री यात्रेसाठी ६ लक्ष बुंदी लाडू प्रसादाची निर्मिती



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : माघी, चेत्री, आषाढी व कार्तिकी अशा चार मुख्य यात्रा पंढरपूर येथे साजरा करण्यात येतात. यामध्ये चैत्री यात्रा सुरू असून भाविकांची दर्शन रांगेत व मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे. या भाविकांना श्रींचा प्रसाद म्हणून मंदिर समिती मार्फत पुरेशा प्रमाणात बुंदी व राजगिरा लाडू प्रसाद उपलब्ध करून देण्यात येत असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येणारा प्रत्येक भाविक दर्शन झाल्यानंतर श्रींचा प्रसाद म्हणून बुंदी व राजगिरा लाडू प्रसाद खरेदी करत असतो. या प्रत्येक भाविकांना लाडू प्रसाद मिळेल या दृष्टीने ६ लक्ष बुंदी लाडू प्रसाद व ६० हजार राजगिरा लाडू प्रसादाची उपलब्धी ठेवण्यात येत आहे. यामध्ये बुंदी लाडू प्रसाद मंदिर समितीमार्फत व राजगिरा लाडू प्रसाद आऊटसोर्सिंग पद्धतीने खरेदी करण्यात येत आहे. ७० ग्रॅम वजनाचे दोन बुंदी लाडू कागदी पिशवीत पॅकिंग करून प्रति पाकीट २० रुपये प्रमाणे व २५ ग्रॅम वजनाचे दोन राजगिरा लाडू पॅकिंग करून प्रति पाकीट १० रुपये प्रमाणे भाविकांना उपलब्ध करून देण्यात येत आहे. यासाठी पश्चिम द्वार, उत्तर द्वार, श्री संत तुकाराम भवन असे एकूण तीन स्टॉल असून, सर्व स्टॉल सकाळी ६ ते रात्री १२ पर्यंत खुले ठेवण्यात येत आहेत.

बुंदी लाडू प्रसाद एमटीडीसी भक्तनिवास येथील लाडू उत्पादन केंद्रामध्ये हरभरा डाळ, साखर, शेंगदाणा डबल रिफाइंड तेल, काजू, बेदाणा, विलायची इत्यादी पदार्था पासून तसेच अन्न व औषध प्रशासनाच्या सर्व नियमांचे पालन करून तयार करण्यात येत आहे. या लाडू प्रसादाची शासकीय प्रयोगशाळेतून खाण्यास योग्य असल्याबाबत तपासणी करून घेण्यात आली आहे. बुंदी व राजगिरा लाडू प्रसाद व्यवस्थेची जबाबदारी अनुभवी विभाग प्रमुख भीमाशंकर सारवाडकर यांना देण्यात आली आहे, याशिवाय सुमारे ९० कर्मचारी परिश्रम घेत असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगितले.

# समतेचा विचार स्वीकारावा लागेल : भीमराव आंबेडकर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : महापुरुषांचा विचाराचा वारसा घेऊन मी संपूर्ण देशभरामध्ये प्रसार व प्रचार करत असतो. बार्टी संस्था महापुरुषांच्या विचाराचा प्रचार करणारी असून छत्रपती शिवाजी महाराजापासुन ते महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्यापर्यंत हा समतेचा वारसा सुरू असुन स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षातही अनेक बदल झाले नसून आपणाला विषमतावादी विचार सोडून महापुरुषांचा समतेचा विचार स्वीकारावाच लागेल असे मत डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू तथा भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष आदरणीय डॉ भीमराव आंबेडकर यांनी बार्टी संस्थेत बोलताना व्यक्त केले.

डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था ( बार्टी) पुणे संस्थेच्या वतीने भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त भारतीय संविधान अमृत महोत्सव अंतर्गत रक्तदान शिबिराचे उद्धघाटन दिनांक ७ एप्रिल रोजी आदरणीय भीमराव आंबेडकर यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले.

पुढे बोलतांना ते म्हणाले की बार्टी संविधानाचा प्रसार व प्रचार करणारी महाराष्ट्र शासनाची महत्वपूर्ण संस्था असुन स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येते.बार्टीने अधिक गतीने विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देऊन विद्यार्थी घडवावेत.बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनिल वारे हे चांगले काम करत असल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले.

श्री वारे म्हणाले की भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा सामाजिक समतेचा विचार तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी बार्टी कटिबद्ध असुन विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा तसेच कौशल्य विभागा अंतर्गत प्रशिक्षण देण्यात येत असल्याचे सांगितले.

महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस विनम्र अभिवादन करण्यात आले.

श्री सुनिल वारे यांच्या हस्ते आदरणीय भीमराव आंबेडकर यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा, बुद्ध आणि त्यांचा धम्म हा ग्रंथ तसेच जयभीम कविता भेट देऊन सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी निबंधक श्रीमती इंदिरा अस्वार, विभागप्रमुख श्रीमती वृषाली शिंदे, प्रकल्प व्यवस्थापक श्रीमती नसरिन तांबोळी, भारतीय बौद्ध महासभेचे श्री भिकाजी कांबळे, रिपब्लिकन विद्यार्थी सेनेचे प्रदेश अध्यक्ष विवेक बनसोडे, श्री राजरत्न थोरात, यांच्यासह बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी तसेच भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी उपस्थित होते.

थोडक्यात...




## सराईत गुन्हेगार उमेश भोसले एमपीडीए अंतर्गत स्थानबद्ध

सोलापूर : शहर परिसरातील फौजदार चावडी,जेलरोड आणि जोडभावी पेठ पोलीस ठाणे परिसरात दहशत पसरवून धोकादायक झालेल्या सराईत गुन्हेगार उमेश नागनाथ भोसलेवर एमपीडीए अंतर्गत स्थानबद्ध करण्याचे आदेश पोलीस आयुक्तांनी दिले आहेत.

उमेश नागनाथ भोसले (वय-२७-,रा.भगवान नगर झोपडपट्टी) असे सराईत गुन्हेगाराचे नाव आहे. त्याने त्याच्या आर्थिक फायद्यासाठी फौजदार चावडी,जेलरोड आणि जोडभावी पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत मागील काही वर्षांपासून सातत्याने दुचाकी चोरी करणे, जीवघेण्या घातक शस्त्राने इच्छापूर्वक दुखापत करणे,जबरी चोरी करणे, खंडणी मागणे आणि घातक शस्त्राणे धमकाविणे यासारखे गंभीर स्वरूपाचे गुन्हे अवैध आर्थिक फायदा मिळवण्यासाठी करत आला आहे.त्याच्याविरुद्ध अशा प्रकारचे गंभीर स्वरूपाचे एकूण बारा गुन्हे दाखल आहेत. उमेश भोसले यांच्या गुन्हेगारी कृत्यामुळे त्याची शहरातील व्यापारी व सामान्य नागरिकांमध्ये दहशत आहे. त्याच्याविरुद्ध सामान्य नागरिक उघडपणे पोलिसांना माहिती देत नाहीत. त्याच्या गुन्हेगारी कृत्यामुळे शहरातील नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत होऊन सार्वजनिक सुव्यवस्थेत बाधा निर्माण झाली आहे.त्याच्या ला गुन्हेगारी कारवायांमुळे सन २०२३ मध्ये व २०२५ मध्ये प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती. त्यानंतर त्याच्या वर्तनात कोणताच बदल झाला नाही. त्याने सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण होईल अशी वरील प्रमाणे गुन्हेगारी कृत्य चालू ठेवले. त्यामुळे त्याच्या गुन्हेगारी कृत्यास वेळीच प्रतिबंध करण्यासाठी पोलीस आयुक्त एम राजकुमार यांनी २५ मार्चला त्याच्या विरुद्ध एमपीडीए अधिनियमन १९८१ अन्वये स्थानबद्धतेचे आदेश निर्गमित करून २६ मार्चला स्थानबद्ध आदेशाची अंमलबजावणी करून येरवडा कारागृह पुणे येथे दाखल केले आहे.

# ‘आदिनाथ’ला आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी कटिबद्ध : खासदार धैर्यशील मोहिते पाटील

## श्री आदिनाथ कारखाना संजीवनी पॅनलच्या प्रचाराचा आज शुभारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आदिनाथ ला आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याची सांगत अरेनातला ऊर्जेत अवस्थेत आणण्यासाठी केंद्र व राज्यस्तरावरील नेते मंडळी भेट घेण्यास आपण कमी पडणार नसल्याची ग्वाही माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार दहीहिल मोहिते पाटील यांनी केली संगोबा तालुका करमाळा येथील सभेत ती बोलत होती तर श्री आदिनाथ कारखाना संजीवनी पॅनलच्या प्रचाराचा नारळ आज फोडण्यात आला संगोबा येथील श्री आदिनाथ महाराजांचे दर्शन घेऊन प्रचाराचा शुभारंभ.

शुभारंभ करण्यात आला यावेळी व्यासपीठावर माजी आमदार जयवंतराव जगताप विद्यमान आमदार नारायण आबा पाटील, सावंत गटाची नीती सुनील सावंत, जिल्हा परिषद माजी अध्यक्ष अनिरुद्ध कांबळे, जिल्हा दूध संघ माजी उपाध्यक्ष राजेंद्र सिंह राजे भोसले, सभापती अतुल भाऊ पाटील जिल्हा परिषद सदस्य सविता देवी राजे भोसले आदिनाथ माजी संचालक धुळा भाऊ कोकरे माजी सभापती गहिनीनाथ नवरे डॉक्टर वसंत पुंडे प्राचार्य जय पकाश पिल्ले राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष संतोष वारे विकास गलांडे नगरसेवक संजय सावंत अल्ताफ तांबोळी जिल्हा परिषद सदस्य बिभीषण आवारे जालिंदर पानसरे जिल्हा परिषदेचे अरुण तोडकर माळशिरस माजी उपसभापती संजय जाधव भाऊसाहेब फुंके डॉक्टर समाधान कोळेकर आदेश सर्व उमेदवार उपस्थित होते.

यावेळी बोलत असताना खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी आपल्या भाषणातून आदिनाथ कारखान्याच्या इतिहासात उजळणी दिली व कारखान्याच्या चालू आर्थिक स्थितीबद्दल सभासदांना माहिती देऊन आगामी काळात आपण या कारखान्याच्या शासन स्तरावर असलेल्या अडचणी सोडवण्यासाठी अविरत प्रयत्न करणार असल्याचे सांगून या पॅनल मधील सर्व उमेदवारांना निवडून देण्याचे आव्हान केले व माजी आमदार जयंतराव जगताप यांनी आपल्या भाषणातून विरोधकाचा खास आपल्या शैलीतून समाचार घेतला व आदिनाथ कारखान्याच्या या निवडणुकीत नव्या उमेदीचे उमेदवार व पॅनल मध्ये निवडणूक रिंगणात उतरले असून या युवाशक्तीचे उर्जेचा उपयोग आदिनाथला उर्जित अवस्थेत आणण्यासाठी निश्चित होणार असल्याची खात्री त्यांनी बोलून दाखवले होते तसेच देशभक्त स्वातंत्र्य सैनिक माजी आमदार नामदेवराव जगताप व सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील हे नेहमी जिल्हा विकासाच्या मुद्द्यावर मतभेद सोडून एकत्र येत असल्याची आठवण करून देऊन तालुक्यातील गावोगाव आता गटातटात बाजूला सारून आदिनाथच्या वाचवण्यासाठी मतदारांनी या पॅनलच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहण्याचे आवाहन माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी केले तर विद्यमान आमदार नारायण आबा पाटील यांनी या कारखान्याच्या वनासाठी कर्मयोगी गोविंदा बापू पाटील यांनी खूप मोठा त्याग केला असून हा कारखाना आणण्यासाठी कुटुंबातील एक घटक समान असल्याचे सांगितले तसेच आदिनाथ साठी आपण आमदार पदाची ताकद यामागे लावणार असून वेळप्रसंगी कोणतीही राजकीय ताकद पणाला लावण्याची आपली तयारी असल्याची आमदार वाटिली यांनी सांगितले व प्रास्ताविक आमदार पाटील नताचे प्रवक्ते सुनील तळेकर यांनी केले तर यावेळी देवानंद बागल सुनील सावंत यांनी विचार मांडले व सूत्रसंचालन डॉक्टर समाधान कोळेकर यांनी केले तर आभार डॉक्टर अमोल घाडगे रविकिरण फुके यांनी मानले विधी तज्ञ राहुल सावंत यांनी मान्यवरांचे स्वागत केले व सदिच्छा मोठ्या संख्येने समाधान उपस्थित होते.




# गोकूळ शुगर लि. धोत्री जिल्हा सोलापूर समोर ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे ऊस बिलासाठी ठिय्या आंदोलन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (एस.के.गायकवाड): तुळजापूर तालुक्यातील वागदरी येथील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आपल्या ऊसासे बिल त्वरित द्यावे या मागणी साठी गोकूळ शुगर लि.समोर बेमुदत ठिय्या आंदोलन सुरु केले आहे.

वागदरी ता. तुळजापूर येथील ऊस उत्पादक शेतकर्यानी ऊस गाळप हंगाम २२४- २२५ मध्ये धोत्री (जिल्हा सोलापूर) येथिल गोकूळ शुगर लि.धोत्री येथे उरु गाळपासाठी पाठविला होता. ऊस घेवून जाण्या पूर्वी गोकूळ शुगर लिं. ने शेतकऱ्यांच्या उसाला २७५५ रू. प्रती टनाल भाव देण्याचे आश्वासन देवून ऊस बिल थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केले जाईल असे सांगीतले होते.शेतकऱ्याच्या फडातुन ऊस जावून सहा महिने होत आहेत. परंतू अध्याप एक दमडीही शेतकऱ्याच्या खात्यावर जमा झाला नाही. वेळोवेळी लेखी व तोंडी मागणी करूनही गोकूळ शुगर लि. च्या प्रशासनाने शेतकऱ्यांच्या ऊस बिलं मागणी कडे दुर्लक्षच केले आहे. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकतरी कुटूंबावर उपासमारीची वेळ आली असून कटूंबाचे आर्थिक नियोजन बिघडले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. अनेक शेतकऱ्याच्या मुला मुलींचा विवाह लांबणीवर पडला आहे. तर काही शेतकऱ्याच्या विद्यार्थांची शैक्षणीक फीस भरावयाची थांबली आहे. केवळ पैसा अभावी विद्यार्थ्यांचे शेक्षणिक नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेवटी वागदरी येथिल शेतकऱ्यानी जो पर्यंत उस बिलं खाल्यावर जमा होत नाही तो पर्यंत गोकूळ शुगर लि. गेट समोर ठिय्या आंदोलन करण्याचा निर्धार करून दि ७ फेब्रूवारी २२५ पासून बेमुदत ठिय्या आंदोलनास सुरुवात केली आहे. या मध्ये रामचंद्र यादव, अमोल पाटील,कल्लाप्पा वाघमारे, हणमंत वाघमारे, मोहन धुमाळ, किशार सुरवसे, राजकुमार पवार, सतिश बिराजदार, फत्तेसिंग ठाकूर, निव्रत्ती बिराजदा, रहिम शेख, रामसिंग परिहार, भरतसिंग ठाकूर सह शेतकरी मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी झाले आहेत.



# हसलगन जिल्हा परीषद प्राथमिक शाळा गुणवत्तापुर्ण शिक्षणासाठी अव्वल




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा : औसा तालुक्यातील हसलगन जिल्हा परीषद शाळा दर्जेदार शिक्षण व उच्च गुनवत्ता देणारी शाळा असुन, जिल्हा परीषद प्राथमिक शाळेचा सुंदर परीसर शाळेतील विद्यार्थ्यांच्या शारिरिक गुणवत्ता वाढीसाठी शाळेच्या परीसरातसुंदर असक्रीडांगण असुन हसलगन शाळेतील विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढिसाठी सदैव प्रयत्नशिल असलेला शिक्षकवृंद, जिल्हा परीषद शाळेत ग्रामपंचायत माध्यमातुन डिजीटल शिक्षणासाठी प्रोजेक्टर .प्रत्येक वर्गात एल ई डी स्क्रीन द्वारे विद्यार्थ्यांना डिजीटल शिक्षण देणारी हसलगनची शाळा ,त्याचबरोबर विज्ञान शिक्षण घेण्यासाठी शाळेत सुंदर अशी प्रयोगशाळा आहे. प्रयोगशाळेच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांना वेगवेगळे प्रयोग करता यावेत यासाठी प्रयोगशाळेत मानवी सापळे सह विवीध प्रयोग साहित्य असलेली सुसज्य प्रयोगशाळा शिकवणारे शिंदे सर यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील विद्यार्थ्यांना प्रयौगाचे दर्जेदार व गुणवत्तापुर्वक शिक्षण देत व शाळेतील सर्व शिक्षक यांच्या अथक प्रयत्नाने दरवर्षी N.m.m.s, नवोदय, स्कॉलरशिप, शिष्यवृत्ती परीक्षेतुन अनेक विद्यार्थी घडवणारी हसलगन जिल्हा परीषद शाळा असुन यावर्षीही हसलगन जिल्हा परीषद प्राथमिक शाळेतुन n.m.m.s परीक्षेत आठवी ची विद्यार्थीनी शिवकन्या गाडेकर, श्रुती कोळी, श्रेया सोमवंशी यांनी पींपिपरीक्षेत यश संपादीत केल आहे, सौने स्वराली शिवराज या विद्यार्थीनीने नवोदय परीक्षेत घवघवित यश संपादन केल आहे. प्रत्येक वर्षी नवनविन परीक्षेच गुणवत्ता पुर्वक निकाल देणारी शाळा मनुन हसलगन शाळेची ओळख आहे.

यावेळी हसलगनचे सरपंच गोविंद कोराळे, उपसरपंच गोपाळ शिंदे, ग्राम विकास अधिकारी नेलवाडे, शालेय व्यवस्थापण समिती अध्यक्ष महादेव मोरे, शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र गुंड, सहशिक्षक झाडे एस बि,पांचाळ एन जी, चव्हान डी के.शिंदे जे एम, कुरेशी सी जी, गोरे एस बी, विभुते डी एस, श्रीमती कांबळे सह हसलगन ग्रामस्थांनी शाळेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे कौतुक करत अभिनंदन केले.

# जपानी तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचा प्रयत्न : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : जपानचे तंत्रज्ञान शेतीच्या क्षेत्रात आणून कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानावर आधारित १ अब्ज लोकांना मदत करायची आहे. मातीचे पुनरुज्जीवन, मॉडेल फार्म तयार करणे, ग्रीन हाऊस तंत्रज्ञान यावर महाराष्ट्र शासन जपानी एम २ लॅबो संस्थेसोबत काम करणार आहे. विपणन साखळीतील गैरप्रकार कमी करून शेतकऱ्यांना सक्षम करायचे आहे. भारतीय शेतकऱ्यांना शिक्षित करून त्यांना जपानमध्ये रोजगार मिळवून देण्यात येणार आहे. जपानी तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

कृषी क्षेत्राच्या विकासासाठी राज्य शासन विविध निर्णय घेत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करीत शेती समृद्ध करण्यात येत आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित तंत्रज्ञान शेतीच्या विकासासाठी उपयोगात आणण्यात येत आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित धोरण जाहीर केले असून जपान व महाराष्ट्र तंत्रज्ञानाचा उपयोग करून एकत्र काम करण्याचे आवाहनही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. एम २ लॅबो जपान ही सुझुकीची कृषी क्षेत्रातील संस्था असून ही सुझुकीची मुंबई, महाराष्ट्रात नोंदणीकृत झालेली पहिली संस्था आहे. या संस्थेच्या अध्यक्षा युरिको कातो सान यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आज भेट घेतली. या भेटीदरम्यान मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्यातील शेती समृद्ध करण्यासाठी जपानी तंत्रज्ञानाचा उपयोग करण्याबाबत संवाद साधला. यावेळी एम २ लॅबो संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी युरिको कातो, मित्र संघटनेचे अध्यक्ष समीर खाळे, एम २ लॅबो भारतचे मुख्य व्यवस्थापकीय अध्यक्ष प्रसून अग्रवाल, देवांग ओझा, एम २ लॅबो जपानचे प्रबंधक मसाको मियाशीता आदी उपस्थित होते.

**स्वेरीच्या शाश्वत शिक्षणपूरक उपक्रमांना मिळाली राष्ट्रीय मान्यता**

**आयक्युएसी विभागात कार्यरत असलेल्या प्राध्यापकांचे अभिनंदन**

# स्वेरीला ‘सस्टेनेबल इन्स्टिट्यूशन्स ऑफ इंडिया- ग्रीन रँकिंग्ज २०२५’ मध्ये ‘गोल्ड’ मानांकन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) ला ‘सस्टेनेबल इन्स्टिट्यूशन्स ऑफ इंडिया- ग्रीन रँकिंग्ज २०२५’ अंतर्गत ‘उत्कृष्टतेचे प्रमाणपत्र’ प्रदान करण्यात आले आहे. हा प्रतिष्ठित सन्मान आर वर्ल्ड इन्स्टिटुशनल रँकिंग तर्फे दिला जातो, जे भारतातील शैक्षणिक संस्थांच्या शाश्वत शिक्षण व्यवस्थापनाचा आढावा घेणारे महत्त्वपूर्ण मानांकन आहे. मार्च २०२५ मध्ये आर वर्ल्ड इन्स्टिटुशनल रँकिंगच्या वतीने देशभरातून वेगवेगळ्या संस्थांना सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले होते. त्यानुसार स्वेरीने सुद्धा सहभाग नोंदवला होता. कागदपत्रांची व माहितीची छाननी पूर्तता बघून मानांकना संदर्भातील निकाल या मार्च २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात त्यांच्या वेबसाईटवर जाहीर केला व मानांकन दिले.

आर वर्ल्ड इन्स्टिटुशनल ग्रीन रँकिंग्स - सस्टेनेबल इन्स्टिट्यूशन्स ऑफ इंडिया (एसआयआय) ही एक अग्रगण्य संस्था आहे जी उच्च शिक्षण संस्थांनी पर्यावरणीय शाश्वततेसाठी घेतलेल्या उल्लेखनीय पुढाकारांना ओळख देण्याचे आणि सन्मानित करण्याचे उद्दिष्ट ठेवते. या रँकिंगच्या माध्यमातून ऊर्जा कार्यक्षमता, कचरा व्यवस्थापन, जलसंधारण, जैवविविधतेचे संरक्षण आणि शाश्वत नवोपक्रम प्रकल्प यांसारख्या विविध निकषांवर संस्थांचे मूल्यमापन केले जाते. संस्था पर्यावरणीय जबाबदारी स्विकारून जागतिक दर्जाच्या शाश्वत मॉडेल्सचा अवलंब करतील, असा प्रेरणादायी संदेश ग्रीन रँकिंग्स - एसआयआय देतात तसेच, संस्थांना हरित उपक्रम राबविण्यासाठी प्रोत्साहन देत, शाश्वत विकासाच्या दिशेने ठोस पावले उचलण्यास प्रवृत्त करण्याचे कार्य ही संस्था करत आहे. स्वेरीने स्थापनेपासून सामाजिक कार्य, एकादशी, वारी काळात केलेले समाज कार्य, ग्रामीण भागात विविध ठिकाणी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून केलेले कार्य, स्वच्छता मोहीम, ग्रीन कॅम्पस धोरणे, ऊर्जा बचत व संवर्धन, पर्यावरणपूरक उपक्रम आणि शाश्वत शिक्षण प्रणाली तसेच सौरऊर्जेचा वापर, कचऱ्याचे व्यवस्थापन, जलसंवर्धन, वृक्षारोपण आणि कार्बन फूटप्रिंट कमी करणे अशा विविध निमित्ताने केलेल्या कार्याची दखल आर वर्ल्ड इन्स्टिटुशनल रँकिंगने घेतली आणि स्वेरीला ‘गोल्ड’ श्रेणी बहाल केली. सध्या जगभरात शाश्वत विकास आणि पर्यावरणपूरक शिक्षणाला प्राधान्य दिले जात आहे तसेच स्वेरी कडून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकासाच्या संकल्पनांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन सातत्याने केले जाते. या मानांकनामुळे स्वेरीच्या पर्यावरणपूरक आणि शाश्वत, जबाबदार शिक्षण व्यवस्थापनास राष्ट्रीय स्तरावर नवी ओळख मिळाली आहे. संस्थेचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस)चे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार व इंटरनल क्वालिटी अशुरन्स सेल (आयक्युएसी) चे समन्वयक डॉ. एस.एस. वांगीकर यांनी या गौरवाबद्दल समाधान व्यक्त केले. त्यांनी सांगितले की, 'स्वेरीच्या संपूर्ण शाश्वत शिक्षणाच्या दिशेने घेतलेल्या पुढाकाराला राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाल्याचा आम्हाला अभिमान आहे. भविष्यातही आम्ही पर्यावरणपूरक आणि शाश्वत विकासासाठी नव्या उपक्रमांची अंमलबजावणी करत




राहू. ही मान्यता स्वेरीच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची पावती असून, भविष्यातही संस्था पर्यावरणपूरक शिक्षण, संशोधन आणि तंत्रज्ञान यामध्ये नवकल्पना राबविण्यासाठी कटिबद्ध राहील.’ या यशाबद्दल स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख इतर विश्वस्त व पदाधिकारी, स्वेरी कॅम्पसचे इन्चार्ज डॉ. एम. एम. पवार, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, स्वेरी अंतर्गत असणाऱ्या सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांनी स्वेरीच्या 'आयक्युएसी' विभागात कार्यरत असलेल्या प्राध्यापकांचे अभिनंदन केले.